# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (हिवाळी) अधिवेशन, २०२५

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### राज्यात सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक विभागाने १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करण्याबाबत

**(१) १२८ (२२-०४-२०२५) श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सर्वांगीण विकासासाठी प्रत्येक विभागाने १०० दिवसांचा कृती आराखडा तयार करून त्यावर कामगिरी करण्याचे निदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिनांक २६ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास सर्व विभागांना दिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निदेशाप्रमाणे कोणकोणत्या विभागांनी कृती आराखडा तयार केला आहे तसेच कृती आराखड्यांचे स्वरूप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२२-०७-२०२५) :** (१) दिनांक ०९/१२/२०२४ रोजी मा.मुख्यमंत्री यांनी सर्व प्रशासनिक विभागांच्या सचिवांसोबत बैठक घेऊन राज्य प्रशासन अधिक गतिमान व पारदर्शक व्हावे यादृष्टीने विवक्षित निदेश दिले. त्यांमध्ये सर्व विभागांनी १०० दिवसांच्या कामगिरीचा अहवाल सादर करावा याचा देखील समावेश आहे.

(२) सर्व संबंधित प्रशासनिक विभाग/विभागांचे भाग यांनी दिनांक २४/१२/२०२४ ते दिनांक १३/०१/२०२५ या कालावधीत आपापल्या १०० दिवस कृती आराखड्यांचे सादरीकरण केले. उक्त आराखडे कालमर्यादित कार्यक्रमाच्या स्वरूपात होते.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### आर्थर रोड कारागृह (मुंबई) कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थान उपलब्ध करून देण्याबाबत

**(२) १८९ (२२-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्थर रोड (मुंबई) येथील कारागृह कर्मचाऱ्यांसाठी असलेल्या निवासस्थानाची धोकादायक इमारत

शासनाकडून पाडण्यात आली असून, सद्य:स्थितीत सदर कारागृहातील कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थान उपलब्ध करून देण्यात आले नसल्याने कर्मचाऱ्यांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी मुंबईतील आर्थर रोड कारागृहात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना शासकीय निवासस्थान उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१०-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) कारागृह अधिकारी/कर्मचारी यांची निवासाची गैरसोय दूर करण्याकरीता अस्तित्वातील जून्या व धोकादायक इमारती पाडून तेथे पोलीस गृहनिर्माण महामंडळामार्फत नवीन निवासस्थानांचे बांधकाम करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
तसेच, वांद्रे येथील शासकीय वसाहतीच्या भूखंडावर बांधण्यात येणाऱ्या नवीन सदनिकांमध्ये मध्यवर्ती कारागृह, मुंबई आणि जिल्हा कारागृह, भायखळा येथील कर्मचाऱ्यांकरीता आवश्यक ५५ निवासस्थाने राखीव ठेवण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागास कळविण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## इतर मागास बहुजन कल्याण विभागात अधिकारी / कर्मचारी यांची नियमित पदभरती करण्याबाबत

**(३) ५२१ (२३-०४-२०२५) श्री.सुधाकर अडबाले, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **इतर मागास बहुजन कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सामाजिक न्याय विभागाचे विभाजन करुन शासनाने इतर मागास बहुजन कल्याण विभागाची स्थापना केल्यानंतर सन २०१७ पासून मंत्रालय स्तरावर व जिल्हास्तरावर विभाग वेगळे झाले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्याने निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण विभागात विभागीय प्रादेशिक उपसंचालक व सहाय्यक संचालक तसेच लिपिकवर्गीय कर्मचाऱ्यांची नियुक्त नियमित न केल्यामुळे अनेक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, इतर मागास बहुजन कल्याण विभागामध्ये अधिकारी / कर्मचारी यांची नियमित पदभरती न करण्याची कारणे काय आहेत तसेच इतर मागास बहुजन कल्याण विभागात विभागीय प्रादेशिक उपसंचालक, सहाय्यक संचालक व लिपिक वर्गीय कर्मचारी यांची नियमित पदभरती तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (२९-०७-२०२५) :** (१) होय
(२), (३) व (४) नाही, इतर मागास बहुजन कल्याण विभागाची नव्याने निर्मिती झाल्यानंतर क्षेत्रिय कार्यालयासाठी नव्याने सुधारित आकृतिबंध मंजूर करण्यात आला आहे. मंजूर आकृतीबंधातील विविध

संवर्गाची पदे भरण्यासाठी नव्याने सेवाप्रवेश नियम तयार करण्यात येत आहेत. तोपर्यंत इतर विभागातील समकक्ष पदांचे सेवाप्रवेश नियम लागू करण्यात आले आहेत. त्यावरून सहाय्यक संचालक / प्रकल्प अधिकारी / संशोधन अधिकारी या संवर्गाच्या मंजूर ५२ पदांपैकी २६ पदे तसेच इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब संवर्गाच्या मंजूर ४४ पदांपैकी ३१ पदे तसेच कनिष्ठ लिपिक संवर्गाच्या मंजूर १०० पदांपैकी १०० पदे याप्रमाणे एकूण १५७ पदे सरळसेवेने भरण्याबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणीपत्र पाठविण्यात आले आहे. सदर सर्व पदांच्या परीक्षा घेण्यात आल्या आहेत. त्यापैकी इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी गट-ब या पदावर ३१ उमेदवारांची शिफारस विभागास प्राप्त झाली असून त्यांच्या नियुक्तीची कार्यवाही प्रगतीत आहे. कनिष्ठ लिपिक या पदासाठी उमेदवारांची प्राथमिक निवड करण्यात आली असून त्यातून उमेदवारांची लवकर शिफारस प्राप्त होईल. त्याचप्रमाणे सहाय्यक संचालक / संशोधन अधिकारी / प्रकल्प अधिकारी या संवर्गाची २६ पदांसाठी मुख्य परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आली असून नजीकच्या काळात सदर पदासाठी उमेदवारांची शिफारस प्राप्त होईल विभागातील प्रादेशिक उपसंचालक हे १००% पदोन्नतीचे पद आहे. सद्य:स्थितीत सामाजिक न्याय व अन्य विभागातील समकक्ष अधिकाऱ्यांची प्रादेशिक उपसंचालक पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्त्या करून ७ पैकी ६ प्रादेशिक उपसंचालकांची पदे भरलेली आहेत.

---

## राज्यात तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना नियमित वेतन मिळण्याबाबत

**(४) ६८२ (२४-०४-२०२५) श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय होवू नये तसेच उच्च शिक्षित बेरोजगार तरुणांना रोजगार मिळावा याकरिता तासिका तत्वावर प्राध्यापक म्हणून नियुक्ती केली जाते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, किती खाजगी संस्थांवर अशा प्रकारे तासिका तत्वावरील प्राध्यापक काम करत आहेत,

(३) असल्यास, उक्त प्राध्यापकांना संबंधित संस्थांकडून वेळेत पगार देण्यात येत नसल्याच्या तक्रारी अनेक संघटना, प्राध्यापक व लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे वारंवार केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून तासिका तत्त्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना नियमित पगार मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत (दादा) बच्चू पाटील (१३-१०-२०२५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) राज्यातील एकूण ९७२ अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये तासिका तत्वावरील अध्यापक कार्यरत आहेत.

(३) व (४) तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन वेळेवर प्राप्त न झाल्याचे निवेदने शासनास प्राप्त झालेली आहेत. तथापि, याबाबत शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२१/ प्र.क्र.१८१ / २१/ विशि-१,दिनांक १७/१०/२०२२ अन्वये तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन वेळेवर अदा करण्यासाठी आवश्यक त्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. तसेच यासंदर्भात प्राप्त होणाऱ्या तक्रारीच्या अनुषंगाने तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधन अदायगी वेळेत करणेबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यासाठी संचालक उच्च

शिक्षण यांना वेळोवेळी कळविण्यात आले आहे. तसेच सदर मानधन अदा करण्यासाठी वेळोवेळी निधी उपलब्ध करुन दिला जातो.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्य शासनाने जाहिर केलेल्या सांस्कृतिक धोरणाच्या अंमलबजावणी करण्याबाबत

**(५) ८५५ (२३-०४-२०२५) श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्राची कला, साहित्य, संस्कृतीच्या वारसाचे, उत्कर्षाचे जतन आणि त्याला कालानुरूप दिशा देण्यासाठी राज्य शासनाने सन २०२४ मध्ये अभ्यास समितीद्वारे सांस्कृतिक धोरण जाहीर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू धोरणाचे थोडक्यात स्वरूप काय आहे तसेच धोरणाची अंमलबजावणी प्रभावीपणे होण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार (२६-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) विभागाच्या दिनांक २३ सप्टेंबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये, “महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक धोरण २०२४” घोषित करण्यात आले आहे. सदर धोरणामध्ये खालील दहा मुख्य क्षेत्रांची निवड करण्यात आली आहे :-
१. कारागीरी
२. भाषा, साहित्य आणि ग्रंथव्यवहार व वाचन संस्कृती
३. दृष्यकला
४. गड-किल्ले-पुरातत्व
५. लोककला
६. संगीत
७. रंगभुमी
८. नृत्य
९. चित्रपट
१०. भक्ती संस्कृती

या धोरणाशी निगडीत असलेल्या उपरोक्त १० क्षेत्रांशी संबंधित संस्था, संघटना, तज्ञ व्यक्ती, कामगार, कलाकार, कारागीर, विविध समाज घटक यांच्या प्रत्यक्ष भेटी व मुलाखती घेतल्या. या धारेणामध्ये आर्थिक, संस्थात्मक, संघटनात्मक, व्यावसायिक, शैक्षणिक, प्रचार व प्रसिद्धी विषयक आणि लोकसहभागाच्या शिफारशीसह अन्य शिफारशी यांचा समावेश आहे. सदरील शिफारशींची अंमलबजावणी करण्याकरीता विभागाच्या दिनांक ०३ ऑक्टोबर, २०२४ व दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजीच्या शासन निर्णयाद्वारे अंमलबजावणी समिती स्थापन करण्यात आली असून, या समितीमार्फत शिफारशींची अंमलबजावणी प्रक्रिया सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## दिव्यांग शाळेतील कंत्राटी कर्मचाऱ्यांना कामगार कायद्या अंतर्गत वेतन मिळणेबाबत

**(६) ८६९ (२२-०४-२०२५) श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिव्यांग शाळेतील सफाई कामगार, मदतनीस, पहारेकरी या संवर्गातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना मूळ वेतन महागाई भत्ता यांच्या ५०% एकत्रित वेतन घेत असून त्यांना कामगार कायद्याअंतर्गत किमान वेतन १८००० पेक्षा कमी वेतन मिळत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांगांच्या दिनांक १८/०८/२००४ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सफाई कर्मचारी, मदतनीस, पहारेकरी यांच्या वेतनाबाबत सुधारणा केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, त्यांना पूर्ण वेळ नियमित वेतनश्रेणी एस-४ प्रमाणे वेतन देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.

सदर पदांवरील कर्मचाऱ्यांना विभागाच्या दिनांक ३ जानेवारी, २०२४ च्या शासन निर्णयानुसार किमान वेतन अधिनियमाप्रमाणे वेतन देण्यात येत आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) कामगार विभागाचे अभिप्राय व वित्त विभागाच्या मान्यतेने शासन उपरोक्त नमूद पदांच्या वेतनात वाढ करणेबाबत दिनांक ०३ जानेवारी, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये "सदर पदांवरील ज्या कर्मचाऱ्यांचे वेतन "अकुशल" वर्गवारीच्या किमान वेतनापेक्षा कमी आहे, अशा कर्मचाऱ्यांचे वेतन संबंधित उपक्रम ज्या परिमंडळाच्या क्षेत्रामध्ये येतो, त्या परिमंडळातील कार्यालयांना अनुज्ञेय असलेल्या दरानुसार निश्चित करण्यात यावे. तसेच कामगार आयुक्त यांचेकडून वर्षातून दोन वेळा जानेवारी ते जून आणि जुलै ते डिसेंबर या कालावधीकरीता महागाई भत्ता जाहीर केला जातो. त्यानुसार एकूण किमान वेतनाची (मूळ वेतन+महागाई भत्ता) वर्षातून दोनदा परिगणना करण्यात यावी.", असा निर्णय घेण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## रायगड जिल्ह्यातील अनेक गावांतील मंदिराच्या नावावर असलेल्या जमिनींचा निर्णय सिडको प्रशासनाने प्रलंबित ठेवल्याबाबत

**(७) १०२३ (१७-०४-२०२५) श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे आणि रायगड जिल्ह्यातील अनेक गावांच्या जमिनी संपादित करून सिडकोने सन १९८० च्या दशकात नवी मुंबई शहर विकसित केले असून तत्कालीन गावातील मंदिरांच्या नावावर असलेल्या जमिनीचा निर्णय सिडको प्रशासनाने अद्यापपर्यंत प्रलंबित ठेवलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जुन्या मंदिराच्या संपादित केलेल्या जमिनींच्या बदल्यात शेतकऱ्यांना १२.५ आणि २२.५% योजनेतला लाभ मिळवण्यासाठी पात्रता मंजूर करण्याचे आदेश शासनाने शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ मर्यादित) महामंडळाला (सिडको माहे डिसेंबर, २०२४ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत,

हे खरे आहे काय,
(३) असल्यास, त्या अनुषंगाने शहर आणि औद्योगिक विकास महामंडळ (महाराष्ट्र) मर्यादित (सिडकोने) कोणती कार्यवाही केली आहे व कुळांच्या नावाने निघणारे हे भूखंड कोणत्या प्रकल्पांसाठी वापरण्यात येणार आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे काय,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२३-०९-२०२५) :** (१), (२) व (३) शासनाने शासन निर्णय दिनांक ०६/०३/१९९० व दिनांक २८/१०/१९९४ नुसार ज्या शेतकऱ्यांची जमीन नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादन केली आहे अशा जमीनधारकांना संपादित जमिनीच्या १२.५% विकसित जमीन देण्याचा निर्णय घेतला आहे. तद्नंतर शासनाने दिनांक १५/१२/१९९७ च्या परिपत्रकानुसार स्वतःची जमीन स्वतः न कसणारे शेत जमीन मालक (Absentee Landlord), मिठागराचे मालक, सार्वजनिक विश्वस्त संस्था आणि इतर संस्था यांना १२.५% टक्के योजनेचा फायदा मिळणार नाही, असे कळविले आहे. सबब, अशा जमिनधारकांना १२.५% योजनेचा लाभ देण्यात आलेला नाही.

तथापि, नवी मुंबई प्रकल्पासाठी खाजगी देवस्थाने, विश्वस्त संस्था जमिनीतील वहिवाटदार / कुळ यांना १२.५% योजनेंतर्गत पात्र प्रकल्पग्रस्त ठरविण्यासाठी सिडको संचालक मंडळाने ठराव क्र. १०५९७, दिनांक २२/१२/२०११ पारित केला आहे.

सिडको संचालक मंडळाच्या ठराव क्र.१०५९७, दिनांक २२/१२/२०११ ला अटी-शर्तीसह दिनांक २६/११/२०२४ रोजी मान्यता देण्यात आली आहे. तसेच सदर ठरावातील अटी व शर्तींनुसार सर्व प्रकरणांची तपासणी करुन शासनास सादर करण्याबाबत सिडकोस निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने सिडको संचालक मंडळाने ठराव क्र.१३०१३, दिनांक ४/१२/२०२४ पारित केला असून प्रकरणनिहाय पडताळणी सिडको स्तरावर सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शिक्षकांना पाठ टाचण काढण्याची सक्ती न करण्याबाबत

**(८) ११६३ (१८-०३-२०२०) श्री.किशोर दराडे, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शिक्षकांना त्यांच्या अध्यापनाच्या अगोदर संबंधित विषय घटकाचे पाठ टाचण काढावे लागत असल्याने सदर पाठ टाचण काढण्याबाबत सक्ती करू नये असे परिपत्रक विद्या प्राधिकरणाने निर्गमित केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त परिपत्रकानुसार शिक्षकांना पाठ टाचण काढणेबाबत सक्ती करू नये अशी मागणी शिक्षक संघटनाकडून करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शिक्षकांना पाठ टाचण काढण्याची सक्ती न करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (०९-१०-२०२५) :** (१) नाही.

(२) होय.

(३) सक्ती करण्याबाबतचे परिपत्रक काढलेले नाही त्यामुळे प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथे एका कुटुंबावर चाकूहल्ला करून रोकड लंपास केल्याबाबत

**(९) १५५६ (२४-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील प्रवर्तन चौकात दोन मुलांसह वडिलांवर रात्री १०.३० चे सुमारास अज्ञात इसमाने चाकूचा वार करून जखमी करून रोकड लंपास केल्याची घटना दिनांक १९ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने दोषीवर कारवाई करण्यासाठी तसेच चोरी, दरोडे यास प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२६-०८-२०२५) : (१)** होय, हे खरे आहे.

मुक्ताईनगर (जि.जळगाव) येथील प्रवर्तन चौकात दिनांक १९/१२/२०२४ रोजी अज्ञात इसमांकडुन खेवलकर कुटुंबातील दोन भाऊ आणि वडीलांवर चाकुचा वार करुन रुपये १०,०००/- इतकी रोकड लंपास केल्याची घटना घडली आहे.

**(२)** सदर प्रकरणी चौकशी करुन मुक्ताईनगर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ४३४/२०२४ BNS कलम ३०९(६) सह शस्त्र अधि. ४/२५ नुसार दिनांक २०/१२/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे, तद्नंतर चौकशीअंती फिर्यादी यांचे भाऊ श्री.मंगेश खेवलकर यांच्या उजव्या खांद्याला गोळी लागल्याचे ज्ञात झाल्यानंतर भारतीय हत्यार कायदा कलम- ३/२५, ४/२५, २७ व भा.न्या.सं.कलम ३१०(२), ३११ हे कलम वाढविण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याचा सखोल तपास करुन चार निष्पन्न आरोपींना अटक करुन मा.न्यायालयात दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे व सदर गुन्ह्यातील एक १७ वर्षीय विधी संघर्षीत बालकाविरुध्द वेगळे दोषारोपपत्र सादर करण्यात आले आहे.

तसेच चोरी, दरोडे यास प्रतिबंध घालण्यासाठी महत्वाच्या व गर्दीच्या ठिकाणी CCTNS कॅमेरे कार्यान्वित करण्यात आले असनु अशा ठिकाणी नियमीत पेट्रोलिंग करण्यात येत आहे. रेकॉर्डवरील गुन्हेगारांना नियमीत चेक करण्यात येत असून सन २०२४ मध्ये MPDA कायद्यान्वये ४५ समाजघटकांना स्थानबध्द करण्यात आलेले आहेत. व CrPC१०७/ BNSS१२६ आणि CrPC११०/BNSS१२९ प्रमाणे प्रभावी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेल्या आहेत.

**(३)** प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## जळगाव शहरातील आशादीप वसतिगृहातून बांग्लादेशी तरुणीने पलायन केल्याने दोषीवर कारवाई करण्याबाबत

**(१०) १५८७ (२३-०४-२०२५) श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव शहर येथील औद्योगिक वसाहतीमध्ये राहणाऱ्या १९ वर्षीय बांगलादेशी तरुणीवर एमआयडीसी पोलीस ठाण्यात पिटा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता, सदर तरुणीस दिनांक २२ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास अटक करून आशादीप वसतिगृहात पाठविण्यात आले असता आशादिप वसतिगृहातून सदर तरुणीने पलायन केल्याची बाब दिनांक २८ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने आशादीप वसतिगृहातून तरुणीने पलायन केल्याप्रकरणी संबंधितांची जबाबदारी निश्चित करून शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे,जळगाव येथे बांग्लादेशी तरूणीवर स्त्रीया व मुली अनैतीक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ (सिट अधिनियम पुर्ननिर्मित) कलम ३,४,५(१)(क),७, सह पारपत्र अधिनियम १९५० कलम ३(ए),६(ए) विदेशी व्यक्ती अधिनियम १४ (अ) प्रमाणे गु.र.नं ९०१/२०२४, दिनांक २१/१२/२०२४ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता सदर तरुणीस दिनांक २२/१२/२०२४ रोजी आशादीप वसतिगृहात पाठविण्यात आले असता, आशादीप वसतिगृहातुन सदर तरुणीने दिनांक २५/०१/२०२५ रोजी पलायन केले आहे.

(२) सदर प्रकरणी जळगांव शहर पोलीस स्टेशन, जळगाव येथे सीसीटीएनएस क्र. ३०/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम २६२ प्रमाणे दिनांक २६/०१/२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच जिल्हा महिला व बालविकास अधिकारी,जळगाव यांनी केलेल्या प्राथमिक चौकशीअंती दिनांक २५/०१/२०२५ रोजी कर्तव्यावर उपस्थित असलेल्या २ महिला(सुरक्षा रक्षक व काळजी वाहक) कंत्राटी कर्मचारी यांनी कर्तव्यात कसुर केल्याचे निदर्शनास आल्याने, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी,जळगाव यांच्या दिनांक २९/०१/२०२५ रोजीच्या आदेशान्वये संबंधित कर्मचारी यांना कामावरुन कमी करण्यात आलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही

---

## मुंबईसह राज्यातील वाहतूकीमुळे होणारे प्रदूषण रोखण्याबाबत

**(११) १७५१ (२४-०४-२०२५) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिवसेंदिवस वाढणाऱ्या प्रदूषणाचा वाहतूक पोलिसांना सर्वाधिक फटका बसत असून

अनेकांना रक्तदाब (बीपी),मधुमेह (शुगर), दम्याच्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील ३ हजार वाहतूक पोलिसांपैकी दिवसभर प्रत्यक्ष रस्त्यावर असणाऱ्या हजारो पोलिसांना प्रदूषणामुळे श्वसन विकारासह विविध समस्यांना तोंड द्यावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबईसह राज्यात वाहतूकीमुळे होणारे प्रदूषण रोखण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०९-०९-२०२५) :** (१) व (२) होय, हे अंशत: खरे आहे.

राज्यात दिवसेंदिवस वाढणाऱ्या प्रदुषणाचा वाहतूक पोलीसांना सर्वाधिक फटका बसत असून अनेकांना रक्तदाब (बीपी), मधुमेह (शुगर). दम्याच्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.
(३) मुंबई, नवी मुंबई, ठाणे व नागपूर वाहतूक विभागातील वाहतुकीचे नियमन करणारे पोलीस अधिकारी/अंमलदारांना प्रदुषणामुळे रक्तदाब (बी.पी.) मधुमेह (शुगर), दमा या सारखे आजार होऊ नये व त्यांचे आरोग्य निरोगी रहावे याकरीता कर्तव्यावर असताना मास्क वापरण्याच्या सुचना त्या त्या आयुक्तालयाने त्यांच्या स्तरावर दिल्या आहेत. त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यात येत आहे.

तसेच रस्ता सुरक्षा सप्ताह दरम्यान जनजागृती मोहिम अंतर्गत शाळा कॉलेज, महत्वाची गर्दीच्या ठिकाणी प्रदुषणासंदर्भात जनजागृती करून जनतेस मार्गदर्शन केलेले आहे.ध्वनी प्रदुषीत करणाऱ्या वाहनांची पडताळणी करुन (PUC) पात्र प्रमाणपत्र नसलेल्या वाहनांवर मो.वा.का. कलम ११५ (७) १७७ अन्वये कारवाई करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील रेडी मिक्स प्लांटचालकांवर कारवाई करण्याबाबत

**(१२) २११८ (२४-०४-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील सिमेंट तयार करणाऱ्या बहुतांश रेडी मिक्स प्लांटच्या ठिकाणी हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी विशिष्ट यंत्रणा उभारून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरशी जोडण्यात आली नसल्याची बाब दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनेक रेडी मिक्स प्लांटचालक महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मार्गदर्शक तत्वांचे पालन करीत नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नियमांचे पालन न करणाऱ्या मुंबईतील रेडी मिक्स प्लांटचालकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२८-०८-२०२५) :** (१) हे अंशत: खरे आहे.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दिनांक ०७/११/२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार व्यावसायिक

रेडीमिक्स प्लांट उद्योगांनी सतत हवा गुणवत्ता तपासणी यंत्रणा बसविलेली आहे. तसेच, दिनांक २७/११/२०२४ रोजीच्या अधिसुचनेनुसार व्यावसायिक रेडी मिक्स प्लांटच्या ठिकाणी हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी विशिष्ट यंत्रणा उभारुन महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या सर्व्हरशी जोडणे बंधनकारक केले असून त्यानुषंगाने अनुपालनाबाबत उद्योंगामार्फत कार्यवाही सुरु आहे.
(२) व (३) हे खरे नाही.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत रेडीमिक्स उद्योगांची वेळोवेळी पाहणी करण्यात येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिनांक ०१/०१/२०२४ ते दिनांक १७/०६/२०२५ या कालावधीत केलेल्या कारवाईमध्ये २८- उद्योगांना बंदचे आदेश, ११-उद्योगांना प्रस्तावित निर्देश, ९-उद्योगांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे व ७-उद्योगांना अटींनुसार उद्योग सुरु करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहे.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

## बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडा भवनाच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक घेण्याबाबत

**(१३) २२७४ (०३-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडा भवनाचे कामकाज पाहणाऱ्या कार्यकारी मंडळातील काही कर्मचारी सदस्यांनी अनियमितता आणि गैरव्यवहार केल्यामुळे तत्कालीन बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त व क्रीडा भवनाचे अध्यक्ष यांनी सन २०१४ मध्ये कार्यकारी मंडळ बरखास्त करून क्रीडा भवनाचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी सहायक आयुक्त पदावरील अधिकाऱ्याची प्रशासक पदी तात्पुरती नेमणूक केल्याच्या घटनेस आजमितीस सुमारे ११ वर्षाहून अधिक काळ होवून गेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडा भवनाच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक घेण्यात येईल, असे नगरविकास मंत्री महोदयांनी सन २०२३ मध्ये विधानपरिषद सभागृहात आश्वासित केले असूनही आजमितीस त्याचे पालन करण्यात आलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडा भवनांचे सूत्र प्रशासकाच्या हाती गेल्यापासून महानगरपालिका कर्मचाऱ्यांचा विविध स्पर्धांमधील सहभाग थांबला असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या क्रीडा भवनाच्या कार्यकारी मंडळाची तातडीने निवडणूक घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे (२४-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीमध्ये निवडणूक प्रक्रियेसाठी आवश्यक बाबीची सक्षम अधिकाऱ्यांची नेमणूक, सभासदांच्या यादी तयार करणे इ. कामे प्रगतीपथावर आहेत. सदरची सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिका क्रीडाभवनाच्या कार्यकारी मंडळाची निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्रीडाभवन या संस्थेचा कारभार सुरळीत चालण्यासाठी तसेच खेळांवर परिणाम होऊ नये म्हणून आवश्यक बाबींची पूर्तता नियमितपणे करण्यात येते.

क्रीडाभवनातर्फे विविध खेळासाठी त्या खेळामध्ये प्राविण्य असलेल्या सभासदांची प्रत्येक खेळासाठी द्विस्तरीय समिती स्थापन करण्यात आली व त्या समितीमार्फत प्रत्येक खेळासाठी खेळाडुना विविध स्पर्धेत सहभागी होण्यासाठी लागणारे मानधन,विशेष नैमित्तीक रजा,खेळाचे साहित्य, गणवेश, किट्स इ. सर्व बाबीची पूर्तता करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या सर्व क्रीडाभवनात कार्यरत असलेले विविध कर्मचारी यांचे मासिक वेतन नियमितपणे अदा करण्यात येते.

क्रीडाभवन प्रशासकामार्फत वर नमूद विविध खेळ,नाट्य व मनोरंजन स्पर्धेमध्ये सहभाग घेण्यासाठी तसेच अंगी असलेल्या कलागुणांना वाव देण्यासाठी उस्फुर्त व नियमितपणे उपक्रम आयोजित केले जातात.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महाड (जि.रायगड) येथील औदयोगिक वसाहत बांगलादेशींसह नक्षलवादयांचे आश्रयस्थान झाल्याबाबत

**(१४) २५८२ (१८-०७-२०२५) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाड (जि.रायगड) येथील औदयोगिक वसाहतीत सुमारे १२ हजारांपेक्षा अधिक परप्रांतीय कामगार कार्यरत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय

(२) असल्यास, सदर परप्रांतीय कामगारांमध्ये अनेकजण जहाल नक्षलवादी असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने बांगलादेशी नागरिकांना शोधण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२५) :** (१) हे खरे नाही.

महाड औद्योगिक वसाहतीमध्ये सुमारे ९० ते १०० औद्योगिक आस्थापना कार्यरत असून,सदर औद्योगिक वसाहतीत सुमारे ६००० कामगार काम करतात. त्यापैकी सुमारे ३००० कामगार हे रायगड जिल्ह्यातील आहेत.

(२) व (३) पी.डी.आय.पी.एल कंपनी तर्फे महाड एमआयडिसी हद्दीत करण्यात येणाऱ्या राज्य महामार्गाच्या कामात ६ बांग्लादेशी कामगार काम करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

पी.डी.आय.पी.एल कंपनीमध्ये काम करणाऱ्या ६ बांग्लादेशी कामगारां विरुध्द (१ माहिला व ५ पुरूष) एमआयडीसी पोलीस ठाणे येथे गु.र.नं ६/२०२५ कलम परकिय नागरीक आदेश १९४८ चे कलम ३(१)(अ), विदेशी व्यक्ती अधिनियम १९४६ कलम १४,पारपत्र (भारतामध्ये प्रवेश) १९५० चे कलम ३ (अ), ६ (अ) प्रमाणे दिनांक १२/०१/२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.सदर प्रकरणातील

आरोपींना अटक करण्यात आली असून ते सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत.

तसेच नक्षलवादी कारवायामधील सहभागाबाबत कोंच पोलीस ठाणे, राज्य बिहार येथे गु.र.नं.०५/२०१४,भा.द.वि.क.१४७,१४९,४२७,४३५,५०६,१७, सी.एल.ॲक्ट १३,१६,१८,२०, यू.पी.ए. ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या एका आरोपीसमौ.नांगलवाडी ता.महाड येथून बिहार टास्क फोर्सचे अधिकारी दिनांक २८/०३/२०२५ रोजी ताब्यात घेवून बिहार येथे घेवून गेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## माध्यमिक वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालय, धुळे व जळगाव येथील अधिक्षकांचे रिक्त पद भरण्याबाबत

**(१५) २९१८ (१८-०७-२०२५) श्री.किशोर दराडे :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माध्यमिक वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालय,धुळे व जळगाव येथील अधिक्षकांचे पद रिक्त असून धुळे व जळगाव येथील अधीक्षक पदाचा अतिरिक्त कार्यभार हा एकाच व्यक्तीला देण्यात आले असल्याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिक्षक माध्यमिक वेतन पथक व भविष्य निर्वाह निधी कार्यालय, धुळे व जळगाव येथील रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.दादाजी भुसे (१०-१०-२०२५) :** (१) हे खरे नाही.

(२) नियतकालिक बदल्या, २०२५ मध्ये अधीक्षक माध्यमिक वेतन व भ.नि.नि. पथक कार्यालय धुळे येथे पदस्थापना देण्यात आली असून, अधीक्षक माध्यमिक वेतन व भ.नि.नि. पथक कार्यालय जळगाव येथे अधीक्षकाचे पद भरणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## परभणी येथे सिंचन वाढीसाठी पाटबंधारे मंडळ स्थापन करणेबाबत

**(१६) ३०२३ (१८-०७-२०२५) श्री.संदीप जोशी :** सन्माननीय **जलसंपदा (विदर्भ,तापी व कोकण खोरे विकास महामंडळ) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंचन वाढीसाठी परभणी येथे पाटबंधारे मंडळ स्थापन करण्यासाठी भगिरथ पाणी परिषद, परभणी यांच्या मागणीनुसार तत्कालीन उप मुख्यमंत्री यांनी दिलेल्या निर्देशानुसार कक्ष अधिकारी यांनी कार्यकारी संचालक गोदावरी पाटबंधारे महामंडळ यांना स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे सूचित केले होते, त्यानुसार सहाय्यक अभियंता गट क्र. २ यांनी दिनांक ३/०७/२०२४ रोजी अहवाल मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे सादर केला असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी अद्याप कार्यवाही न झाल्याने पुन्हा भगिरथ पाणी परिषद परभणी यांच्या दिनांक ४/०५/२०२५ च्या स्मरणपत्रानुसार स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री महोदय यांना दिनांक

५/०५/२०२५ ला निवेदन पाठवून सादर केलेल्या अहवालानुसार परभणी येथे पाटबंधारे मंडळ स्थापन करण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने पाटबंधारे मंडळ स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली तसेच याबाबत शासनाची भूमिका काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०१-०९-२०२५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) परभणी येथे पाटबंधारे मंडळ स्थापन करण्याबाबतच्या भगीरथ पाणी परिषद, परभणी यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाच्या दिनांक १२/०६/२०२५ रोजीच्या पत्रान्वये गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयाकडून अहवाल मागविण्यात आला आहे. महामंडळ कार्यालयाने दिनांक ०२/०७/२०२५ रोजीच्या पत्रान्वये मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर या प्रदेश कार्यालयाकडून अहवाल मागविला आहे. दरम्यान मा.मंत्री जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ) यांच्या निर्देशानुसार मुख्य अभियंता(जसं), जलसंपदा विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या अध्यक्षतेखाली महामंडळाचे कामकाज गतिमान, लोकभिमुख व कार्यसुसंगत करणेकामी आस्थापनेची पुनर्रचना करणेबाबत समिती स्थापन करण्यात आली असून लोकप्रतिनिधींच्या मागण्या व कार्यालयाची गरज यांचा अभ्यास करुन सदर समिती अहवाल सादर करणार आहे. समितीचा अहवाल व प्रदेश कार्यालयाचे अहवाल विचारात घेऊन महामंडळ कार्यालयामार्फत सादर होणाऱ्या अहवालाच्या अनुषंगाने सदर निवेदनावर कार्यवाही करण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नागरी संरक्षण दलाच्या मागण्यांबाबत

**(१७) ३३२६ (१७-०७-२०२५) श्री.श्रीकांत भारतीय, श्री.सचिन अहिर, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात युध्दजन्य व आपत्कालीन परिस्थितीमध्ये नागरिकांना सहाय्य करण्याकरीता प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने नागरी संरक्षण कायदा, १९६८ अन्वये नागरी संरक्षण दलाची स्थापना करण्यात आली आहे, या दलात काम करणाऱ्या स्वयंसेवकांना सन २०१२-१३ पासून जवळपास १५०/- रूपये प्रतिदिन इतकी कमी मानधनाची रक्कम देण्यात येत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, होमगार्डच्या धर्तीवर या नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना नोकरीमध्ये आरक्षण देण्याची, त्यानुषंगाने वयात सवलत देण्याची तसेच रेल्वे व अन्य शासकीय आस्थापनांमध्ये सामावून घेवून रोजगार मिळवून देण्याबाबत तसेच या दलातील राष्ट्रपती पदक विजेते हे विविध प्रकारच्या सोई-सुविधांपासून वंचित असल्याने त्यांना त्या उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी सातत्याने शासनाकडे करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या दलाची कार्यालये यापूर्वी स्थानिक मनपाच्या शाळा, शासकीय आस्थापना यामध्ये संध्याकाळच्या वेळेस कार्यरत असून नागरी संरक्षण दलामध्ये अधिकारी कर्मचारी अपुरी

संख्या,निधीअभावी वाहनाचा अभाव, प्रशिक्षणासाठी अदययावत यंत्रणा उपलब्ध नसल्याचे नुकतेच माहे मे,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास,आपत्तीमध्ये बचाव आणि मदतीसाठी हे स्वयंसेवक घडविले जात असतानाही गत कांही वर्षापासून स्वयंसेवकांचे प्रशिक्षण ही बंद असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, नागरी संरक्षण दलातील स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्याकरीता तसेच या दलाचे काम सुरळीत सुरू रहावे याकरीता मंजूर शासकीय पदांपैकी रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (१२-०९-२०२५) :** (१) होय.

नागरी संरक्षण स्वयंसेवकांना दिनांक ०१/०४/२०१४ पासून रुपये १५०/- कर्तव्य भत्ता देण्यात येत आहे.

(२) नाही.

(३) बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यांच्या शाळांमधील वर्गखोल्या उपनियंत्रक, नागरी संरक्षण, बृहन्मुंबई यांच्याकडून सन २०१८ मध्ये काढून घेतल्या आहेत. त्यामुळे नागरी संरक्षण दलाच्या मालकीच्या जागेमध्ये क्रॉस मैदान, भोईवाडा (दादर पश्चिम), माहिम, विक्रोळी, मुलुंड, कांदिवली, अंधेरी, गोवंडी व चेंबूर या ठिकाणी नागरी संरक्षण दलाचे सायंकाळी व दिवसा प्रशिक्षण चालू आहे.

नागरी संरक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील कार्यालयांकडे प्रशिक्षण तसेच कार्यालयीन कामासाठी वाहने अपुरी असल्याने नवीन वाहन खरेदीचा प्रस्ताव संचालनालयाने दिनांक ३०/०६/२०२५ अन्वये सादर केला असून त्यावर कार्यवाही सुरु आहे.

तसेच, केंद्र शासनाच्या नागरी संरक्षण मास्टर ट्रेनर्स आणि स्वयंसेवक प्रशिक्षण योजनेंतर्गत महाराष्ट्र नागरी संरक्षण संचालनालयास रुपये ४,५७,२०,०००/- इतका निधी केंद्र शासनाकडून प्राप्त झाला आहे. केंद्र शासनाच्या निर्देशांच्या अधीन राहून सदर रकमेतून प्रशिक्षणासाठी आवश्यक असणारे साहित्य खरेदी व प्रशिक्षणावरील खर्च याप्रमाणे खर्च करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही.

(५) नागरी संरक्षण संचालनालयातील अधिकारी/कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पुणे जिल्ह्यातील वडगाव आठवडी बाजारातील परप्रांतीय विक्रेत्यांच्या आधार कार्डच्या पडताळणी कारण्याबाबत

**(१८) ३८५८ (१७-०७-२०२५) श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वडगाव (जि.पुणे) येथील आठवडी बाजारातील परप्रांतीय विक्रेत्यांच्या आधार कार्डची पडताळणी करण्याबाबतची मागणी वडगाव शहरातील नागरिकांनी मावळ तहसिलदार, पोलीस निरीक्षक, नगरपंचायत मुख्याधिकारी तथा प्रशासक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली असल्याची बाब माहे एप्रिल २०२५ मध्ये वा

त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देशात कानाकोपऱ्यांमध्ये रोहिंग्या बांगलादेशी व पाकिस्तानी घुसखोर यांच्या संख्येमध्ये वाढ झाली असून सदर बाजारातील विक्रेत्यांकडील आधार कार्ड तपासून त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस (२५-०८-२०२५) :** (१) होय.
(२) मावळ पोलीस स्टेशन हद्दीतील वडगांव आठवडी बाजारातील परप्रांतीय विक्रेत्यांच्या आधार कार्डची पडताळणी नगर पंचायत कार्यालयाकडून स्वतंत्र पथकाव्दारे करण्यात आलेली आहे. सदर पडताळणीमध्ये २०६ परप्रांतीय विक्रेत्यांच्या आधार कार्डची तपासणी केली असून,त्यामध्ये रोहिंग्या, बांग्लादेशी व पाकिस्तानी नागरिक आढळलेले नाहीत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## अकोला जिल्ह्यातील शाळांनी दहावीच्या विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती, खाजगी शिक्षण संस्था व कोचिंग क्लासेस यांना दिल्याबाबत

**(१९) ४००९ (१८-०७-२०२५) श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील शाळांनी दहावीच्या विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती, मोबाईल क्रमांक, खाजगी शिक्षण संस्था, कोचिंग क्लासेस यांना दिल्यामुळे विद्यार्थ्यांना वैयक्तिक फोन करुन वेगवेगळया क्सासेसला प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी व पालकांना वारंवार फोन करुन त्रास दिला जात असून खाजगी संस्थामार्फत फॉर्म भरुन घेणे हे गैर कायदेशीर असल्याबाबतची तक्रार शिक्षणाधिकारी माध्यमिक, अकोला यांच्याकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अशाप्रकारे विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती, मोबाईल क्रमांक याबाबतचा डेटा खाजगी संस्था, क्लासेस यांना प्राप्त झाल्यामुळे विद्यार्थी व पालक विशेषत: विद्यार्थिनींना मोबाईलवर वारंवार फोन करुन त्यांचा मानसिक छळ होत असल्याचे त्याचसुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी तपास करुन अशा विद्यार्थ्यांची वैयक्तिक माहिती ज्या शाळांनी परस्पर खाजगी संस्था, क्लासेस यांना दिली आहे, त्यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दादाजी भुसे (१३-१०-२०२५) :** (१) व (२) हे खरे नाही.
अशी कोणतीही तक्रार शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, अकोला यांच्या कार्यालयास प्राप्त झालेली नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही..

---

## वसई येथील औद्योगिक वसाहत आणि अन्य उद्योग क्षेत्रातील युनिट्स आणि कारखान्यांना अनियमित वीज पुरवठा होत असल्याबाबत

**(२०) ४५३४ (०३-०७-२०२५) श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई येथील औद्योगिक वसाहत आणि अन्य उद्योग क्षेत्रातील सुमारे १२,००० लहान-मोठ्या उत्पादन युनिट्स आणि कारखान्यांना पुरेसा वीजपुरवठा होत नसल्यामुळे, त्यांना त्यांचे उत्पादनाचे वेळापत्रक व्यवस्थित पाळता येत नाही, त्यामुळे उत्पादनावर परिणाम होत असल्याने त्यांना आर्थिक अडचणींचाही सामना करावा लागत असून, कामगारांचे वेतन आणि इतर खर्च भागवण्यासाठी त्यांना संघर्ष करावा लागत असल्याची बाब दिनांक ११ जून, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वसई-विरार शहरात गत चार महिन्यांपासून अनियमित वीज पुरवठा होत असल्याने नागरिक हैराण झाले असून, सदर उद्योगही इतर राज्यात जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे आणि वसई येथील वीज वितरण प्रणालीमध्ये सुधारणा करणे, वीज निर्मिती वाढवणे आणि उद्योगांना आवश्यक असलेला पुरेसा वीजपुरवठा उपलब्ध करुन उद्योगांना वीज वाचविण्यासाठी व कार्यक्षमतेत सुधारणा करण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस (०९-०७-२०२५) :** (१) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणामार्फत तयार करण्यात येणाऱ्या सर्व्हिस रस्त्याच्या कामामुळे २२०/२२ के.व्ही. नालासोपारा अतिउच्चदाब उपकेंद्रातून निघणाऱ्या २२ के.व्ही पोमण उच्चदाब वीज वाहिनीच्या भूमिगत केबल विविध ठिकाणी नादुरुस्त झाल्यामुळे दिनांक ०२ जून, २०२५ पासून वीजपुरवठा खंडित झाला होता, केबल जॉईंट करुन वेळोवेळी वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. दिनांक ११ जून २०२५ नंतर पोमण (कामण) येथील वीजपुरवठा सुरळीत सुरु आहे.

(२) हे खरे नाही.

पावसाळयाच्या दिवसात वीज वाहिन्यांत विविध तांत्रिक दोष निर्माण होतात. त्यामुळे वीजपुरवठा खंडित होतो. तथापी महावितरणच्या कर्मचाऱ्यांद्वारे तसेच सूचिबध्द कंत्राटदारांद्वारे तात्काळ दुरुस्ती करुन वीज पुरवठा पूर्ववत करण्यात येतो.

(३) वसई मंडळामध्ये एम.आय.डी.सी. फेज-१ योजनेंतर्गत ३ स्विचींग स्टेशन, २२ केव्ही पातळीची १२ कि.मी. उच्चदाब उपरी तार वाहिनी व ३३ कि.मी. उच्चदाब भूमिगत ५ कि.मी. उपरी तार मार्ग उच्चदाब वाहिनी व २५ कि.मी. भूमिगत वाहिनीचे काम पूर्ण झाले आहे. क्लस्टर डेव्हलपमेंट फंड (SIDBI) या योजनेंतर्गत ४९.५० कि.मी. भूमिगत उ
च्चदाब वाहिनी मंजूर असून १२ कि.मी. चे काम पूर्ण झाले आहे.

कामण येथे महापारेषणतर्फे करण्यात येत असलेल्या २२०/२२ केव्ही क्षमतेचे अति उच्चदाब विद्युत उपकेंद्राचे काम प्रगतीपथावर आहे. वरील कामांमुळे वसई येथील औद्योगिक वसाहत व अन्य उद्योग क्षेत्रासह शहराला नियमित वीजपुरवठा होण्यास मदत होणार आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**नागपूर.**

**डॉ.विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.